RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक १(११)] गुरुवार, जानेवारी २, २०२५/पौष १२, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००

**असाधारण क्रमांक ११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमांन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-१३१/ई-९९६४०६/CR-७३८/२०२४.—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समूह, वस्ती/वस्त्यांचा समूह, वाडी/वाड्यांचा समूह गाव म्हणुन विनिर्दिष्ट करण्यात येते;

आणि ज्याअर्थी, **विक्रमगड** तालुक्यातील **मोहो बु.** ग्रामपंचायतीतील **भिमरपाडा** पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह / वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक १९ मे २०२३ रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, **उपविभागीय अधिकारी, वाडा, विभाग वाडा** यांनी यासंदर्भात दिनांक २१ जून २०२३ रोजी **मोहो बु.** ग्रामपंचायतीत येणाऱ्या **भिमरपाडा** पाडा/वस्ती/पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यांची संबधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे;

आणि ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी पालघर** यांनी चौकशी अंती संबंधित पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि त्याअर्थी, मी, **डॉ. राजेश देशमुख, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **विक्रमगड** तालुक्यातील **मोहो बु.** ग्रामपंचायतीतील **भिमरपाडा** येथे पाडा/वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपरिक हद्द खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | हद्दीचे तपशील | समूह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| १. | पुर्वेस | २१८ | चिंचपाडा डॅम |
| २. | पश्चिमेस | ०२ | शिंदाई दहाड |
| ३. | दक्षिणेस | २१५ | आलोंडे |
| ४. | उत्तरेस | १८/१५,१११ | करांज दहाड |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळून उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई,
दिनांक २६ डिसेंबर २०२४.

**डॉ. राजेश देशमुख,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.